# "लवासा विमेन्स ड्राईव्ह" पुन्हा सुरु होतोय

## *२७ फेब्रुवारी २०११ रोजी "लवासा विमेन्स ड्राईव्ह २०११" मध्ये सहभागी व्हा व कर्करोगाविरोधातील लढ्याला पाठिंबा द्या.*

**मुंबई, २५ जानेवारी, २०११:** दरवर्षी ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभरात महिला दिन म्हणून साजरा केला जातो. यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडचा एक उपक्रम लवासा विमेन्स ड्राईव्ह (एलडब्ल्यूडी) **रविवार दिनांक २७ फेब्रुवारी, २०११** रोजी आयोजित करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील स्त्रियांना एकत्र आणून त्यांच्या स्त्रीत्वाचा गौरव करणे व त्यांच्यातील धैर्य व प्रभाव दाखवून देणे असा हा अनोखा उपक्रम आहे. महिलांना होणाऱ्या कर्करोगाबद्दल जागरुकता वाढविण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेला लवासा विमेन्स ड्राईव्ह हा स्त्रियांकरता अतिशय लोकप्रिय उपक्रम बनला आहे.

**लवासा विमेन्स ड्राईव्ह**ने नेहमीच आधुनिक स्त्रीच्या क्षमतांचा गौरव केला आहे. दिवसेंदिवस व दर शहरागणिक या सोहळ्याला जास्तीत जास्त यश प्राप्त होत आहे. यावर्षी मुंबईच्या बरोबरीनेच पुणे व लवासामध्येही या उपक्रमाच्या निमित्ताने अनेक मनोरंजक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी एलडब्ल्यूडीचा जास्तीत जास्त भौगोलिक विस्तार व्हावा यासाठी यामध्ये दोन कारचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक कार आठ नवीन शहरांचे प्रातिनिधीत्व करणार आहे. या सर्व शहरांमध्ये एलडब्ल्यूडी पहिल्यांदाच दाखल होत आहे. पुण्याव्यतिरिक्त नवी दिल्ली, कोलकाता, चेन्नई, बँगलोर, हैद्राबाद, नागपूर व गोवा ही शहरे यंदाच्या वर्षी एलडब्ल्यूडीमध्ये सामील होत आहेत.

**लवासा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. राजगोपाल नोगिया** यांनी सांगितले की, *"यंदा लवासा विमेन्स ड्राईव्ह तिसऱ्या वर्षात पदार्पण करीत आहे. आजवर लवासा विमेन्स ड्राईव्हच्या वाटचालीचा आलेख कायम चढता राहीला आहे. यावर्षी महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून नावाजल्या जाणाऱ्या पुणे शहराला आमच्या या उपक्रमात सामील करवून घेऊन आम्ही एक महत्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या ड्राईव्हमध्ये नेहमीच अनेक पैलूंना स्पर्श केला जातो - मनोरंजन, मौजमजा, साहस व आधुनिक भारतीय स्त्रीची शक्ती व प्रभाव, तिची काळजी घेण्याची वृत्ती व कर्करोगाचे उच्चाटन करण्यासारख्या सामाजिक कार्याबद्दलची तिची तळमळ व निष्ठा या सर्वांचा मेळ साधून आम्ही हा उपक्रम साजरा करीत असतो."*

तिसऱ्या वर्षात पदार्पण करीत असताना एलडब्ल्यूडीला आणखी मोठे, आणखी चांगले व अधिक मनोरंजक स्वरुप प्राप्त करवून देण्यासाठी सर्व तयारी करण्यात आली आहे. या आकर्षक उपक्रमात एकूण ५०३ कार, मुंबईतून ३५२ व पुण्यातून १५१ अशा एकूण २०११ स्त्रिया सहभागी होणार आहेत.

**टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या विमेन्स कॅन्सर उपक्रमाच्या उपाध्यक्षा श्रीमती देविका भोजवानी** यांनी सांगितले की, *यंदाच्या वर्षी या उपक्रमात पुणे शहराला सामील करवून घेतले जात असल्याने हा ड्राईव्ह अधिक मोठ्या प्रमाणावर साजरा केला जाईल याची मला खात्री वाटते व या संपूर्ण उपक्रमासोबत जोडले जाणे ही माझ्याकरता खरोखरीच अतिशय आनंदाची बाब आहे. या ड्राईव्हमधील प्रत्येक कार ही महिलांना ग्रासणाऱ्या कर्करोगांबाबत जागरुकता वाढविणे तसेच या कार्याकरता निधी जमा करण्यासाठी चालविली जात असते आणि म्हणूनच ड्राईव्हमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या साहसाबद्दल मला खूपच कौतुक वाटते. या कार्याबद्दलची त्यांची तळमळ व निष्ठा याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते व त्यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल मी त्यांची खूप-खूप आभारी आहे.*

महिलांच्या कर्करोगाबद्दल जागरुकता वाढविणे हा एलडब्ल्यूडीचा मुख्य उद्देश असल्याने अनेक स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, कॉर्पोरेटस् व अनेक व्यक्ती आपआपल्या उद्धीष्टांना प्रसिद्धी मिळवून देण्यासाठी व पाठिंबा मिळविण्यासाठी यामध्ये सहभागी होणार आहेत.

प्रत्येक कारमध्ये ड्रायव्हर व नेव्हीगेटर अशा दोन स्त्रियांनी सहभागी होणे आवश्यक आहे. वैध ड्रायव्हींग लायसन्स (वाहन चालक परवाना) असलेल्या स्त्रियांनी कृपया www.lavasawomensdrive.com या वेबसाईट नोंदणी करावी. अधिक माहितीकरता कृपया ०२२ - ६७९५६७६९ या क्रमांकावर कोमिला यांच्याशी संपर्क साधावा. या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी उत्सूक असणाऱ्या स्त्रियांची संख्या प्रचंड मोठी असल्याने एका विशेष यंत्रणेची निर्मिती करण्यात आली आहे ज्यामध्ये उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक स्त्रीला स्वतःकरता मते मिळवावी लागतील. जास्तीत जास्त मते प्राप्त करणाऱ्या भाग्यशाली स्त्रियांना लवासाच्या टेकड्या सर करण्याची संधी मिळेल.

तांत्रिक बाबी, परीक्षण प्रक्रिया व रस्त्यावरील नियमन या सर्व बाबी वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनकडे सोपविण्यात आल्या आहेत. या ड्राईव्हची पद्धत वेळ-अंतर-वेग अशाप्रकारची असेल. या फेब्रुवारी महिन्यात लवासा विमेन्स ड्राईव्हमध्ये सामील व्हा व महिलांना ग्रासणाऱ्या कर्करोगांचे उच्चाटन करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागरुकतेचा प्रसार करण्याच्या या कार्यात सकारात्मक योगदान देऊन नवीन दशकाचे स्वागत अनोख्या पद्धतीने करा.

###

**अधिक माहितीकरता कृपया येथे संपर्क साधावाः**
जशोदा माधवजी
सिनियर मॅनेजर
वैष्णवी कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स
पत्ता - दुसरा मजला, आर्मी ॲन्ड नेव्ही बिल्डींग, १४८, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
मोबाईल - ९९८७२७४०२५/ ९८९२२१७००७
बीबी पिन - 21FC7D8C
ईमेल - jashoda.madhavji@gmail.com/ jashoda.madhavji@live.com
फोन - ०२२-६६५६८७०७
फॅक्स - ०२२-६६५६८७८८